starting sch
ministers order granting permission 2003-20

(15)

शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
- 6 JUL 2004
आवक क्रमांक ६९४६२
शाखा ५९२

महाराष्ट्र शासन
क्रमांक: व्हीएलएस १००४/(२३३/२००४/प्राशि -३
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :०२ जुलै, २००४.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे / बृहन्मुंबई / अमरावती.

विषय : <u>सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत</u>

नविन प्राथमिक शाळांना परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ११ (अकरा) शैक्षणिक संस्थांना सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात संस्थेच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००३" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्हाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित

संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह. उमराणीकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर/ ठाणे / अकोला /बुलढाणा / वर्धा.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३